**L. A. BILL No. LXII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १ जुलै २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६५ चा महा. ४०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री

(शा.म.मु.) एचबी ६६४–१ (४४०–७-२०२५)

पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ; (२०२५ चा महा. अध्या. २.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १५०क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५०क मध्ये, पोट-कलम (१) मधील,— (१९६५ चा महा. ४०.)

(१) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, नगरपरिषद, राज्य शासनाच्या मान्यतेने, मालमत्ता कर भरण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला शास्तीमध्ये सूट देईल :";

(२) विद्यमान परंतुकामध्ये, " परंतु," या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. (२०२५ चा महा. अध्या. २.)

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या तरतुदींनुसार, नगरपरिषदा, नगर पंचायती त्यांच्या क्षेत्रांच्या अंतर्गत स्थित असलेल्या जमिनी आणि इमारती किंवा दोन्ही यांवर मालमत्ता कर बसवितात.

२. नगरपरिषदा आणि नगर पंचायती यांच्याद्वारे बसविण्यात येणारा मालमत्ता कर हा, मालमत्ताधारक अशा मालमत्ता वापरात नसण्याच्या कारणामुळे, मालमत्ताधारकांच्या आर्थिक अडचणीमुळे आणि अनेक कारणांमुळे भरत नाहीत असे निदर्शनास आले होते. उक्त अधिनियमाच्या कलम १५०क मध्ये, जर करांची रक्कम भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीने विनिर्दिष्ट वेळेच्या आत ती भरली नाही तर, जी अदत्त करांची रक्कम किंवा तिचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. कालौघात, विनिर्दिष्ट वेळेत करांची भरणा न केल्यामुळे, उक्त शास्तीची रक्कम, मालमत्ता करांच्या रकमेपेक्षा जास्त होते आणि ती वाढतच राहते. म्हणून, शास्ती भरण्याची रक्कम, मालमत्ता करांच्या रकमेपेक्षा जास्त असल्याने किंवा दंडाची रक्कम सतत वाढत असल्यामुळे, अनेक मालमत्ताधारक करांची उक्त थकबाकी भरत नाहीत. याचा नगरपरिषदा व नगर पंचायती यांच्या कर संकलनावर प्रतिकूल परिणाम होत होता.

३. पाणीपुरवठा, स्वच्छता, पदपथ दिवे, रस्ते, इत्यादींसारख्या सुख-सुविधा पुरवण्याकरिता करांची वेळेवर वसुली करणे आवश्यक आहे. मालमत्ता करांची थकबाकी प्रदान करण्याकरिता मालमत्तेच्या मालकांना प्रोत्साहन देण्यासाठी शास्तीमध्ये सूट देण्याचा विषय विचाराधीन होता.

तथापि, सध्या उक्त अधिनियमामध्ये मालमत्ता करांवरील शास्तीच्या रकमेत सूट देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे परिषदेला, राज्य शासनाच्या मान्यतेने, मालमत्ता कर भरण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला शास्तीच्या रकमेत सूट देण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम १५०क मध्ये सुधारणा करणे, शासनास इष्ट वाटले.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. २), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १२ जून, २०२५.

**एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).

**सन २०२५ चे वि. स. विधेयक क्रमांक ६२.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक २०२५ याचे परिशिष्ट.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे.**

**(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक ४०)**

**१.** ते **१५०.** * * * *

[१][**१५०क.** (१) उपरोक्तप्रमाणे दिलेले असेल असेल अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनाकापासून तीन महिन्यांच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल ; आणि जर, कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्ती-ने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील :

बिलाच्या न दिलेल्या रकमेवर शास्ती बसविणे.

परंतु, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) अधिनियम, २००९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, २००९ चा "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमान्वये ज्यासाठी बील देण्यात आले आहे, असा कोणताही असल्यास, मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहिला असेल तर, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती, उक्त, २००९ च्या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमा अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल.

(२) * * * *

**१५०ख.** व **१५०ग.** * * * *

**१५२.** ते **३५१.** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२.]**

**[ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री ( नगरविकास).**]**

**[विधानसभेने दिनांक १ जुलै २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.